**"प्रेस नोट"** दि. १७/०३/२०२६

# विविध राज्यातील आंतरराज्य टोळीतील ९ आरोपीना दरोडा घालण्याचे तयारीत असताना अटक केलेबाबत.

दिनांक १६/०३/२०२६ रोजी २२.३० वा चे सुमारास मुलुंड पोलीस ठाण्यातील सपोनि विजय पवार यांना त्यांच्या गुप्त बातमीदारामार्फत खबर मिळाली की, उत्तर प्रदेश राज्यातील केबल लुटणा—या एका आंतरराज्यीय टोळीतील मुख्य सुत्रधार हे त्यांचे १० ते १२ साथीदारांसह त्यांचे आयशर वाहन घेवुन उत्तर प्रदेश राज्यातुन दरोडा टाकण्याचे तयारीत असुन त्यासाठी आवश्यक साहीत्य व कटींग मशीन्ससह रात्री एल.बी.एस रोड मुलुंड येथे एम टी एन एल ची केबल लुटण्यासाठी येणार आहेत. सदर माहीतीची खातरजमा करण्याकरीता सपोनि विजय पवार, सपोनि मनोज पाटील, पोहवा घुगे, पोह बाविस्कर, पोशि भोर, पोशि ढेबे, पोशि ठाकुर व पोशि पाटील यांच्या तीन टीम तयार करण्यात आल्या.

मिळालेल्या माहीतीच्या आधारे दिनांक १७/०३/२०२६ रोजी ००.२५ वाजेचे सुमारास खबर मिळालेल्या ठिकाणी एल.बी.एस.रोड, मुलुंड प. मुंबई येथे कोणलाही संशय येणार नाही या स्थितीत सापळा रचुन आरोपीना ताब्यात घेण्यात आले. सदर बाबत मुलुंड पो.ठाणे गुरनं ३५३/२०२६ कलम ३१०(१) (४) (५) (६), ३२४(३) भा.न्या.सं सह क ४/२५ भा ह का सह कलम ३७(१), १३५ मुंबई पोलीस कायदा प्रमाणे गुन्हा दाखल करून खालील नमुद ९ आरोपीना अटक करण्यात आली आहे

१) नेहाल वाजुउददीन सय्यद, ४८ वर्षे, धंदा— बिगारी रा.ठी. उत्तरप्रदेश.
२) मोहम्मद इसरूल मो.गयास कुलीहा, २० वर्षे धंदा—बिगारी रा.ठी उत्तरप्रदेश
३) इक्राम मोहम्मद अझहर, २१ वर्षे धंदा— बिगारी रा.ठी उत्तरप्रदेश
४) अभिषेक राजकुमार महातो,२२ वर्षे, रा.ठी सब्जी मंण्डी, गाजीपुर, दिल्ली
५) आहद मो.शबराती आलम, ४० वर्षे, धंदा — चालक, रा.ठी बिहार
६) मोहम्मद राजा मो.हासीम अन्सारी, ३० वर्षे रा.ठी. दिल्ली
७) मोहम्मद मुर्शिद मो.अजीब अन्सारी, २९ वर्षे रा.ठी बिहार
८) संजय दिनेश महातो, ३८ वर्षे धंदा— चालक, किर्तीनगर, दिल्ली
९) संजयकुमार शिवजी शाह, ४२ वर्षे धंदा —ड्रायव्हर रा.ठी बिहार

सदर गुन्हयात घटनास्थळावरून एक आयशर वाहन, एक हायड्रा क्रेन, ०२ लोखंडी तलवारी,०१ चाकु, ०२ लोखंडी हातोठे, फायबर मुठ असलेल्या ०४ पटाशी, लोखंडी पहार, १०एक्सा ब्लेड, एक्सा ब्लेडचे ०२ हॅन्डल, लाकडी दांडा असलेले टिकाव, एक लोंखडी छन्नी, वर्तूळाकार रबरी पॅकींग, पाच पिवळया रंगाचे प्लास्टीक हेल्मेट, लाल रंगांचे ०२ रिफ्लेक्ट जॅकेट, दोन निळया रंगाचे कटर, लोखंडी वायररोप, १० ट्रॅफिक सेप्टी कोन तसेच काळया रंगाची

०६ फुट ०९ इंच लांबीची एम.टी.एन.एलची वायर असा एकुण **१२,२२,०००/—रूपयांचा** मुददेमाल हस्तगत करण्यात आला आहे.

अटक आरोपीस आज रोजी मा.न्यायालयात रिमांडकामी हजर केले असता मा.न्यायालयाने त्यांना दिनांक २०/०३/२०२६ रोजी पावेतो पोलीस कोठडी रिमांड मंजुर केला आहे.

सदरची उत्कृष्ट कामगिरी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई श्री. देवेन भारती, मा. पोलीस सह—आयुक्त, कायदा व सुव्यवस्था श्री. सत्य नारायण चौधरी, मा. अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग, चेंबुर श्री. डॉ. महेश पाटील मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ७ श्री. हेमराजसिंह राजपूत, मा. सहायक पोलीस आयुक्त मुलुंड विभाग श्री संदीप मोरे यांचे यांचे मार्गदर्शनाखाली आणि वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री अजय जोशी यांचे देखरेखीखाली मुलुंड पोलीस ठाणेचे सहायक पोलीस निरीक्षक विजय पवार, मनोज पाटील तसेच पोहवा घुगे, पोहवा बाविस्कर, पोशि भोर, पोशि ढेबे, पोशि ठाकुर व पोशि पाटील यांनी केलेली आहे.

...............